कृषी उन्नती योजना-राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत अन्नधान्य पिकांचा सन २०१८-१९ चा अखर्चित ₹१४१५.१६ लाख निधी पुनर्जिवित करून सन २०१९-२० मध्ये अभियानांतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गासाठी विनियोगात आणण्यास मान्यता प्रदान करणे.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : असुअ-२०१९/प्र.क्र.३६/४-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २४ सप्टेंबर, २०१९

संदर्भ:-

१. कृषी व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३१/१७-अे,दि.१९/०४/२०१७
२. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३ दि. ०१/०४/२०१९
३. कृषी, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.-२०१६/१६-२ NFSM दि. १८/०४/२०१९
४. कृषी आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/विप्र१/राअसुअ/कृआ/प्र.क्र.१/१३१/१९, दि.२४/०४/२०१९
५. कृषी आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/विप्र१/राअसुअ/कृआ/प्र.क्र.१/१५३/१९, दि.२९/०५/२०१९
६. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. अेअेपी-२०१९/प्र.क्र.२३ /४-अे, दि.०३ /०६/२०१९
७. कृषी, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र No.२०-२७/२०१७-NFSM(CA-V), दि.०४ /०६/२०१९
८. कृषी आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/वि.प्र.१/रासअसु/निवि१९२०/प्र.क्र.१०/१६४/१९, दि.११/०६/२०१९
९. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. असुअ-१०१९/प्र.क्र.३१ /४-अे, दि.१९ /०७/२०१९

प्रस्तावना:-

सन २०१९-२० करिता केंद्र शासनाने शासनाने संदर्भ क्रमांक ३ येथील दि.१८/०४/२०१९ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत अन्नधान्य पिकांसाठी (भात, गहू, कडधान्य व पौष्टिक तृणधान्ये) ₹२२०१९.८१५५ लाख (केंद्र हिस्सा ₹१३२११.८८९३ लाख+राज्य हिस्सा ₹८८०७.९२६२ लाख) निधीचा कृती आराखडा मंजूर केला आहे व त्यास शासनाने संदर्भ क्रमांक ६ येथील दिनांक ०३ जून, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

सन २०१८-१९ मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत अन्नधान्य पिकांसाठी प्राप्त केंद्र हिश्श्याच्या निधीपैकी राज्य शासनाकडे अखर्चित असलेला ₹ ३११४.२९ लाख निधी सन २०१९-२० मध्ये विनियोगात आणण्यासाठी केंद्र शासनाने संदर्भ क्रमांक ७ येथील दि. ०४ जून, २०१९ च्या पत्रान्वये अंतरिम उपयोगीता प्रमाणपत्राच्या आधारे पुनर्जिवित करुन दिला आहे. सदर निधीचा व राज्य हिश्श्याच्या निधीचा प्रवर्गनिहाय तपशिल पुढीलप्रमाणे-

परिशिष्ट - अ

(₹ लाखात)

अ.क्र.	प्रवर्ग	केंद्र हिस्सा (६०%)	राज्य हिस्सा (४०%)	एकूण अखर्चित निधी
१	सर्वसाधारण	१४९४.४२७	९९६.२७	२४९०.६९७
२	**अनुसूचित जाती**	**८७९.७८**	**५८६.५२**	**१४६६.३०**
३	अनुसूचित जमाती	७४०.०८	४९३.३८	१२३३.४६
एकूण		**३११४.२८७**	**२०७६.१७**	**५१९०.४५७**

तथापि, सन २०१९-२० मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत अन्नधान्य पिकांसाठी अनुसूचित जमातीकरिता मंजूर असलेल्या ₹१.०० कोटी निधीमधून पहिल्या हप्त्याकरिता केंद्र हिश्श्याचा ₹६९७.७४ लाख व राज्य हिश्श्याचा ₹४६५.१६ लाख निधी संदर्भ क्रमांक ९ येथील दिनांक १९.०७.२०१९ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे. त्यामुळे राज्य हिश्श्याचा केवळ ₹५३४.८४ लाख निधी BEAMS प्रणालीवर शिल्लक आहे. सबब, सदर राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत अन्नधान्य पिकांकरीता अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राज्य हिश्श्याचा ₹५३४.८४ लाख निधी व त्यानुसार केंद्र हिश्श्याचा ₹८०२.२६ लाख निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरीत करणे आवश्यक आहे. तसेच अनुसूचित जाती प्रवर्गाच्या अखर्चित निधीपैकी ₹ ७८.०६ लाख निधी (केंद्र ₹ ४४.८९ लाख + राज्य ₹ ३३.१७ लाख) अभियानाच्या PFMS संलग्न बँक खात्यावर शिल्लक आहे. सबब, परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील एकूण अखर्चित निधी ₹१४६६.३० लाख पैकी पुढीलप्रमाणे ₹१४१५.१६ लाख निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

परिशिष्ट -ब

(₹ लाखात)

प्रवर्ग	उपलब्ध केंद्र हिस्सा			राज्य हिस्सा			एकूण		
	BEAMS	PFMS	एकूण	BEAMS	PFMS	एकूण	BEAMS	PFMS	एकूण
अनुसूचित जाती	८०२.२६	४४.८९	८४७.१५	५३४.८४	३३.१७	५६८.०१	१३३७.१०	७८.०६	१४१५.१६

सबब, अनुसूचित जाती प्रवर्गाच्या अखर्चित केंद्र हिस्सा ₹८०२.२६ लाख आणि PFMS वरील एकूण ₹७८.०६ लाख असा एकूण ₹८८०.३२ लाख निधीचा विनियोग करण्यास मान्यता देणे तसेच, सदर अखर्चित निधीपैकी शासन स्तरावर उपलब्ध असलेल्या केंद्र हिश्श्याच्या ₹ ८०२.२६ लाख निधीचे व समरुप राज्य हिश्श्याच्या ₹ ५३४.८४ लाख निधीचे वितरण करण्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय -

१. सन २०१८-१९ मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत अन्नधान्य पिकांसाठी अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता प्राप्त केंद्र हिश्श्याच्या निधीपैकी अखर्चित असलेला केंद्र हिश्श्याचा ₹ ८४७.१५ लाख व त्या समरूप राज्य हिश्श्याचा ₹ ५६८.०१ लाख असा एकूण ₹ १४१५.१६ लाख निधी (रुपये चौदा कोटी पंधरा लाख सोळा हजार फक्त) पुनर्जिवित करुन सन २०१९-२० मध्ये सदर अभियानांतर्गत अन्नधान्य पिकांकरिता अनुसूचित जाती प्रवर्गासाठी विनियोगात आणण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. परिच्छेद क्र.१ अन्वये पुनर्जिवित केलेल्या ₹ १४१५.१६ लाख निधीपैकी केंद्र हिश्श्याचा ₹ ४४.८९ लाख व राज्य हिश्श्याचा ₹ ३३.१७ लाख असा एकूण ₹७८.०६ लाख निधी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाच्या PFMS संलग्न बँक खात्यावर शिल्लक असून तो सन २०१९-२० मध्ये विनियोगात आणावा.

३. परिच्छेद क्र.१ अन्वये पुनर्जिवित केलेल्या ₹ १४१५.१६ लाख निधीपैकी केंद्र हिश्श्याचा ₹ ८०२.२६ लाख निधी (रुपये आठ कोटी दोन लाख सव्वीस हजार फक्त) व राज्य हिश्श्याचा ₹ ५३४.८४ लाख निधी (रुपये पाच कोटी चौतीस लाख चौ-याऐंशी हजार फक्त) असा एकूण ₹१३३७.१० लाख निधी आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात येत असून तो सन २०१९-२० मध्ये पुढील लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा.

केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा
मागणी क्रमांक डी-३ २४०१- पीक संवर्धन (००) (७८९) अनुसूचीत जाती उपयोजना (००) (०५) कृषी उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके (केंद्र हिस्सा ६०%) (केंद्र पुरस्कृत योजना) अनुसूचित जाती उपयोजना (२४०१ A१६३), ३३, अर्थसहाय्य	मागणी क्रमांक डी-३ २४०१- पीक संवर्धन (००) (७८९) अनुसूचीत जाती उपयोजना (००) (०६) कृषी उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके (राज्य हिस्सा ४०%) (केंद्र पुरस्कृत योजना) अनुसूचित जाती उपयोजना (२४०१ A१७२), ३३, अर्थसहाय्य

४. या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानातंर्गत (अन्नधान्य पिके) करीता उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य हिस्याच्या ₹ १४१५.१६ लाख रक्कमेचे जिल्हा निहाय/ कार्यालय निहाय वाटप करण्याकरीता संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांना प्राधिकृत करण्यात येत असून अभियानांतर्गत वितरीत निधी PFMS प्रणालीद्वारे खर्ची टाकावा.

५. सदर निधी खर्च करताना संदर्भाधीन अ.क्र.६ येथील दि. ०३ जून, २०१९ च्या शासन निर्णयातील अटी, शर्ती व कार्यपद्धतीचे पालन करण्यात यावे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१७३/२०१९/व्यय-१, दि.१८/०७/२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचे सांकेतांक २०१९०९२४१५४६०५१९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KIRAN N PATIL

Digitally signed by KIRAN N PATIL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=657661007c4f6885bf8deae62f13606632589e592d8c18ceb9a49bfd30471850, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=64a3950913946fa68fe576faead463fd8ae1e3844a820d921b663674927a476e, ou=AGRICULTURE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KIRAN N PATIL
Date: 2019.10.01 15:52:19 +05'30'

(डॉ.किरण पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानमंडळ, मुंबई
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
५. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
७. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, पुणे
८. सर्व जिल्हाधिकारी
९. सर्व विभागीय कृषि सहसंचालक
१०. सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी
११. सर्व कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद

१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१३. सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद
१४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, शास्त्रीनगर, अकोला
१५. .सह संचालक लेखा व कोषागरे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, पाचवा मजला,मंत्रालयासमोर, मुंबई -३२
१६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञयेता / लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ /२, मुंबई / नागपूर
१७. महालेखाकार (स्थानीय निकाय लेखापरिक्षा व लेखा), प्रतिष्ठा भवन ,१०१ महषी कर्वे मार्ग,मुंबई-४०० ०२०
१८. नियोजन विभाग (कार्यासन - १४३१ / कार्यासन - १४४४), मंत्रालय, मुंबई - ३२
१९. वित्त विभाग (व्यय-१) /अर्थसंकल्प -१३) मंत्रालय, मुंबई - ३२
२०. निवडनस्ती (कार्यासन-४अे)